पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस / ४ / कावि / १०८१ / २०१२
दिनांक :- १० / ०८ / २०१२

प्रति,

मा. ........................................
सदस्य, क्रिडा समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची सभा दिनांक १६ / ०८ / २०१२ रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १६ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.
मा. क्रिडा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**

दिनांक :- १६ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी ४ : ०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १६ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ४:०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकिय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

**दिनांक ०१/०८/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ७ ) सभावृत्तांत कायम करणे.**

विषय क्रमांक १) प्रस्तावात नमुद प्रमाणे शासकीय जिल्हास्तर शालेय क्रिडास्पर्धा २०११-१२ अनुषंगाने प्रस्तावात नमुद ५१ खेळांपैकी १८ खेळांच्या स्पर्धांचे आयोजन खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना द्याव्या लागणा-या र.रु.१,२१,८४७/- चे खर्चास मान्यता देणेकामी मा. स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक २) प्रस्तावात नमुद प्रमाणे जिल्हास्तर शालेय ५० खेंळ प्रकारांच्या क्रिडा स्पर्धा २०१२ - १३ आयोजित करणेस व स्पर्धेकामी पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर, पंच मानधन, पंच चहा - अल्पोपहार खर्च, नारळ, बुके, पूजा खर्च, स्टेशनरी खर्च, साहित्य भाडेपोटी खर्च, प्रेक्षागृह भाडे, इतर खर्च इ. सन २०१२-१३ मध्ये विभागीयस्तर स्पर्धेसाठी म.न.पा.शाळेतील अंदाजे ३०० विद्यार्थी खेळाडू व राज्य पातळीवर १५०, राष्ट्रीय पातळीवर ५० व संघटनेमार्फत आयोजित क्रिडा स्पर्धेसाठी ५० शालेय खेळाडू त्यांच्या समवेत जाणारे क्रिडा शिक्षक व व्यवस्थापक यांचे प्रवास खर्च दैनिक भत्ता, प्रवेश फी, औषध खर्च, इ. अदा करणेकामी अंदाजे र.रु.१,००,०००/- तसेच खाजगी शाळा १४ क्रिडा स्पर्धा आयोजित करणार असल्याने त्यांना स्पर्धेचा खर्च र.रु.९४,३९०/- अदा करणेस असे एकूण येणा-या संभाव्य खर्च र.रु.८,६७,७१०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता घेणेस तसेच जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने मंडप, बैठक व्यवस्था, ध्वनी/ विद्युत व्यवस्था मैदान तयार करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, इ. स्वरुपाचा खर्च हा प्रभाग कार्यालयामार्फत होणार आहे. त्यासाठी प्रत्यक्ष येणारा खर्च प्रभागाचे अंदाजपत्रकातून खर्ची टाकणेस, जिल्हास्तर शालेय क्रिडा स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च क्रिडा निधी-वार्षिक क्रिडा स्पर्धा, क्रिडा कला साहित्य या लेखाशिर्षावर

केलेल्या एकूण तरतूद र.रु.४०,००,०००/- मधून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ३) प्रस्तावात नमुद प्रमाणे एकत्रित मानधनावर विविध प्रकारचे खेळांकरिता क्रिडा शिक्षकांची तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधीकरीता नेमणूक करावयाची झालेस एकूण अपेक्षित खर्च र.रु.२,१०,०००/- फक्तचे खर्चास व पदनामाचे पदे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर ६ महिने कालावधीकरीता जाहिरात प्रसिध्दी करुन भरणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / १०८१ / २०१२
दिनांक :- १० / ०८ / २०१२

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांचे विषयपत्र ( डॉकेट्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेले आहे.

\\१७२.१६.०.६७\e drive\Nagersachiv१\Krida १२ - १३ new\Krida Agenda ८ -१२ - १३.doc